# प्रेस नोट :- दिनांक २१/१२/२०१७.

पाषाण सर्कल पाषाण पुणे येथील पंजाब नॅशनल बँक पाषाण शाखा यांचे खातेधारकांच्या खात्यातुन दिनांक ११/१२/२०१७ रोजी पासुन परस्पर बेकायदेशीररित्या बेंगलोर कर्नाटक येथुन ए.टी.एम द्वारे अनाधिकृतरित्या पैसे काढल्याच्या खातेधारकांच्या तक्रारी आमचेकडे व बँकेकडे प्राप्त झाल्याने पंजाब नॅशनल बँक पाषाण शाखेचे बँक मॅनेजर नामे मोहम्मद आरीफ आजादहुसेन यांनी चतुःश्रृंगी पोस्टे येथे दिनांक १३/१२/२०१७ रोजी तक्रार दिल्याने चतुःश्रंगी पोस्टे येथे गु.र.न.५९५/२०१७ भादवि क ४१९,४२०,४६७, ४६८,४७१,४७४,४७७ सह आयटीॲक्ट क.४३ (अ),६६,६६(सी), ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर दाखल गुन्हयाचा प्राथमिक तपास करुन फसवणुक झालेल्या बँक खातेधारकांच्या खात्यांचे तांत्रिक विश्लेषण केले असता, पंजाब नॅशनल बँक पाषाण सर्कल येथील ए.टी.एम सेंटर मध्ये माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये ज्या ज्या बँक खातेदारकांनी ए.टी.एम कार्डदवारे ट्रान्झॅक्शन केलेले होते त्याच खातेदारकांच्या खात्यातुन बनावट ए.टी.एम कार्डचे आधारे बेंगलोर येथुन ए.टी.एम. बँकेद्वारे वेगवेगळया रक्कमा काढल्याचे आम्हास तपासादरम्यान दिसुन आले. त्यावरुन आणखीन तांत्रिक विश्लेषण करुन बेंगलोर येथे दिनांक १५/१२/१७ रोजी एक पोलीस पथक रवाना केले. सदरच्या पोलीस पथकाने बेंगलोर येथे जावुन आरोपीतांनी ज्या-ज्या ठिकाणाहुन पैसे काढले होते त्या ठिकाणी जावुन टेहळणी करुन आरोपीतांचा मागोवा घेतला त्याचदरम्यान पुन्हा अचानकपणे वसई ठाणे येथे ए.टी.एम मधुन सदरच्याच विदेशी आरोपीतांनी पैसे काढण्याचे काम सुरु केले त्यामुळे पुन्हा नव्याने आणखीन एक पथक तयार करुन लागलीच वसई ठाणे या ठिकाणी पाठविण्यात आले व बँगलोर येथील पथकास मुंबई येथे तात्काळ बोलावुन घेतले सदरची दोन्ही पथके वसई ठाणे येथे असताना स.पो.नि. श्री संजय ठेंगे यांचे गोपनीय बातमीदारामार्फत विविध बँकाचे कार्ड क्लोनिंग करुन ए.टी.एम सेंटर मधुन रक्कमा काढणाऱ्या परकीय नागरिकांबाबत माहिती मिळाल्याने दोन्ही पथकांमध्ये समन्वय साधुन परकीय नागरिक **1) BALAN FLOREA CRISTINEL, AGE 45, रा. ROMANIA देश 2) LAZAR ALIN CRISTI, AGE 22, रा. सदर 3) IRIMIA DRAGOS IONUT, AGE 26, रा. सदर** यांना बनावट कार्डसह वसई ठाणे येथे वपोनि श्री दयानंद ढोमे यांनी रंगेहाथ पकडले आहे.

सदर विदेशी आरोपीतांना गुन्हयामध्ये दिनांक १९/१२/२०१७ रोजी वपोनि श्री दयानंद ढोमे यांनी अटक केली असुन आरोपींची दिनांक २८/१२/२०१७ रोजी पर्यंत रिमांड घेण्यात आलेली आहे. आरोपीतांकडुन अटक मुदतीत त्यांनी तयार केलेले क्लोन (बनावट) ए.टी.एम कार्ड ५४, एक स्किमर, दोन लॅपटॉप, तीन मोबाईल, तसेच रोख रक्कम २,४४,०००/- रुपये हस्तगत करण्यात आले आहे .

सदर दाखल गुन्हयात सुमारे १०३० नागरिकांची बँकविषयक गोपनीय संवेदनशील माहिती पंजाब नॅशनल बँक पाषाण सर्कल ए.टी.एम येथुन माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये स्किमरच्या सहाय्याने सदर आरोपीतांनी चोरुन घेतली होती व सदर माहितीच्या आधारे नविन बनावट ए.टी.एम. कार्ड बनवुन दिनांक ११/१२/२०१७ ते दिनांक १६/१२/२०१७ रोजी पर्यंत बेंगलोर येथुन व दिनांक १८/१२/१७ ते १९/१२/१७ रोजी पर्यंत वसई येथुन विविध ए.टी.एम. मधुन काढुन घेवुन अपहार केलेला आहे. नमुद आरोपीतांना अटक केल्याने आणखीन विविध बँकेच्या ८९० बँक खातेधारकांची फसवणुक होण्यापासुन रोखले आहे.

सदर कारवाई ही मा.रविन्द्र सेनगावकर सो, अपर पोलीस आयुक्त, उत्तर/दक्षिण विभाग, पुणे शहर, मा. गणेश शिंदे सो. पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३, मा. विक्रम पाटील सो. सहा.पोलीस आयुक्त चतुःश्रृंगी विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली मा. दयानंद ढोमे वरिष्ठ पोलीस चतुःश्रृंगी पो.स्टे. यांनी व सपोनि श्री संजय ठेंगे, सपोनि श्री दत्ता शिंदे, पोना विकास मडके, पोना सचिन गायकवाड, पोना अजय गायकवाड, पोशि प्रविण पाटील, पोशि अमर शेख, यांचे पथकाने केलेली आहे. तसेच दाखल गुन्हयामध्ये वेळोवेळी आवश्यक समन्वय साधण्यासाठी मा.वैशाली गलांडे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि श्री संदेश केंजळे, पो हवा सरवदे, पो हवा पोतदार, पो हवा अविनाश सावंत, पो हवा ताथवडे,पो हवा काकडे, पो हवा ढमाळ, पो हवा ससार, पो ना सचिन कांबळे यांची मदत घेण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास वपोनि श्री दयानंद ढोमे हे करीत आहेत.